## जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम : विविध क्षेत्रांतील व्यक्तिमत्त्वांच्या पत्नींची यशोगाथा

# पतीच्या कर्तृत्वाला सहचारिणीची नि:स्वार्थी साथ

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पतीने स्वकर्तृत्वातून आभाळाएवढी उंची गाठली, नावलौकिक मिळविला; पण स्वत: मात्र नि:स्वार्थ भावनेने पतीच्या पावलावर विश्वासाने पाऊल टाकत घराची धुरा सांभाळली. जोडीदाराच्या मागे कायम सावलीसारख्या राहिल्या. कोणी स्वत:चे अस्तित्व विसरल्या; पण मुलांच्या पंखांना बळ देऊन त्यांना स्वत:च्या पायावर उभे केले, तर कोणी तरुण वयात स्वत:चा मुलगा गेल्याचे दु:ख पचवून वंचित मुलांना आईची माया दिली... ही यशोगाथा आहे विविध क्षेत्रांतील कीर्तिवंत व्यक्तिमत्त्वांच्या सहचारिणींची!

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून हिंदू महिला सभेने आयोजित केलेल्या 'आम्ही सहचारिणी' या कार्यक्रमात उपस्थित महिलांनी कुटुंबासह सुखी-समाधानी आयुष्य कसे जगत आहोत, याचा पट उलगडला. विद्या वाचस्पती डॉ. शंकर अभ्यंकर यांच्या पत्नी अपर्णा, राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांच्या पत्नी शुभांगी, व्हायोलिन वादक रमाकांत परांजपे यांच्या पत्नी वसुंधरा, अभिनेता मोहन जोशी यांच्या पत्नी ज्योती, गायक विजय कोपरकर यांच्या पत्नी नीता आणि 'आपलं घर'चे विजय पळणीकर यांच्या पत्नी साधना यांनी सुख-दु:खांच्या आठवणींना उजाळा दिला. ज्योत्स्ना भोळे सभागृहात शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेत्री शुभांगी दामले यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

आई-वडिलांना नाटकात काम करणे आवडायचे नाही; त्यामुळे मोहन यांच्याकडून 'नाटकात काम करणार नाही,' असे वडिलांनी लिहून घेतले होते. त्यानंतरच आईने आमच्या लग्नाला परवानगी दिली, अशी आठवण ज्योती जोशी यांनी सांगितली.

गाण्यामुळे विजय कोपरकर यांच्यावर भाळले नाही तर गाण्यातील माणूस भावला, अशी मार्मिक टिप्पणी करून गीता कोपरकर म्हणाल्या, "माहेरी गाणे नव्हते; पण आवड होती. जावई गाणारा मिळाला आहे, हे ऐकून आईला आनंद झाला. परस्थिती पाहून पुढे जायचे असा माहेरचा शिरस्ता. शास्त्रीय संगीतातले मला काही समजत नाही. शास्त्रीय संगीताच्या मैफलीला गेल्यानंतर गाणे चांगले झाले की नाही, एवढे मात्र कळते."

सुरुवातीला संस्थेच्या अध्यक्षा सुप्रिया दामले यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा प्रास्ताविकातून घेतला. तृप्ती कैसरे यांनी सूत्रसंचालन केले. वंदना जोगळेकर यांनी आभार मानले.

### मदत म्हणून मिळालेल्या कपड्यांचा वापर

◆ मुलाचे वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी निधन झाल्याने सामाजिक कार्याचा वसा घेतलेल्या साधना पळणीकर म्हणाल्या, "आपलं घरच्या माध्यमातून अनाथ मुलांचे संगोपन करीत आहे. यासाठी शासनाकडून कुठल्याही प्रकारची मदत घेत नाही. लोकांच्या मदतीतून हे कार्य सुरु आहे. लोकांकडून मिळालेले कपडे आम्हाला का देता? अशी विचारणा आपलं घरमधील एकाने केली होती. त्यानंतर गेल्या १८ वर्षांपासून विजय पळणीकर मदत म्हणून मिळालेले कपडेच वापरत असल्याचे मोठ्या धैर्याने सांगितले."



### स्वातंत्र्य द्या, पण स्वैराचार नको

◆ सामाजिक कार्याविषयीची माहिती देताना शुभांगी आफळे यांनी धर्मांतराचा मुद्दा छेडला. हिंदू मुलींना फूस लावून त्यांचे धर्मांतर केले जाते. लव्ह जिहादमधून ८ मुलींना सोडविले आहे. धर्मांतर झालेल्या मुलींना परत धर्मात आणले आहे. मुलींना स्वातंत्र्य द्या; पण स्वैराचार करु देऊ नका, अशी विनंती त्यांनी या प्रसंगी केली. १८ वर्षांवरील मुलींना लव्ह जिहादमधून सोडविताना अडचणी येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

१ अपर्णा अभ्यंकर म्हणाल्या, "संस्कृत हा माझा आवडीचा विषय. एमए झाल्यानंतर संस्कृत शिक्षिका व्हायची इच्छा होती; पण शंकर अभ्यंकर यांनी 'तुला खूप मोठे कार्य करायचे आहे,' असे सांगितल्यामुळे त्यांच्या कार्यात वाहून घेतले. संतांवर ६ पुस्तके लिहिली. भारतीय संस्कृती संवर्धनावरील पाच हजार पानांचा भक्तिकोश तयार केला. लोणावळा येथील वैश्विक संत विद्यापीठ उभारणीची जबाबदारी घेतली. अभ्यंकर यांची प्रवचने ऐकून अनेकांचे आयुष्य पालटले. अनेकजण व्यसनमुक्त झाले. हिंदू धर्मावरील श्रद्धा वाढली. जे नास्तिक होते, ते आस्तिक झाले."

२ शुभांगी आफळे म्हणाल्या, "कीर्तन-गायनाशी लग्नापूर्वी कधी संबंध आला नव्हता. कीर्तनकाराशी लग्न झाले तरी कधी कीर्तन करावेसे वाटले नाही. बुवांची खूप कीर्तने होत." ते कधीतरी मला बदली कीर्तनकार म्हणून पाठवतील, असे वाटल्याने कीर्तन करावेसे वाटले असे नाही, अशी मिस्कील टिप्पणी त्यांनी केली.